मोटार अपघात दावा क्र.४२ /२०२४
सिमा विरुध्द परमेश्वर व इतर
निशाणी क्रमांक १२

**गैरअर्जदारातर्फे उलटतपास श्री.आर.व्ही.गायकवाड, विधीज्ञ यांचे मार्फत शपथेवर सुरु.**

१९. मी घटनास्थळ पाहीलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या गावातून उदगीर येथे यावयाचे असल्यास हकनकवाडीच्या वळणावरुन जावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, ते वळण खूप मोठे वळण आहे. हे मला सांगता येत नाही की, गावावरुन उदगीरला येतेवेळेस वळणावर उजवीकडे वळावे लागते व उदगीर वरुन जाताना डावीकडे वळावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, सदर वळणाच्या दोन्ही बाजूस दुकाने आहेत. मी घटणास्थळ आजूबाचुच्या लोकांकडे घटनेबाबत विचारणा केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपघात कोणाच्या चुकीमुळे झाला हे मला निश्चीत सांगता येत नाही. साक्षीदार सांगते की, त्यावेळी मी हजर नव्हते. प्रमोद किशन गायकवाड यांनी फिर्याद दिलेली मी वाचली. हे म्हणणे खरे आहे की, त्या मध्ये पल्सर मोटार सायकलचा नंबर किंवा चालकाचे नांव नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १२/०२/२०२४ रोजी मी पोलीस अधिक्षक, लातूर यांचे कडे अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या अर्जामध्ये सामनेवाला याने हयगयीने, बेदरकारपणे अति वेगाने वाहन चालवून माझ्या पतीच्या मोटारसायकलला धडक दिली असे नमुद नाही. दिनांक २२/०२/२०२४ च्या अर्जा मध्ये देखील हयगयीने, बेदरकारपणे अतिवेगाने वाहन चालवल्याचे नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रमोद गायकवाड याच्या अर्जामध्ये वाहनाचा नंबर व चालकाचे नांव नमुद नसल्याने तक्रार घेता येत नाही असे मला उदगीर ग्रामीण पोलीसांनी सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, एकदा तक्रार घेतली की, परत तक्रार घेता येत नाही असे मला पोलीसांनी सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस माझ्या सांगण्याप्रमाणे तक्रार घेत नसल्याने व सामनेवाला पोलीस कर्मचारी असल्याने मी पोलीस अधिक्षक व पोलीस महानिरीक्षक यांचे कडे तक्रारी केल्या. माझ घटनेनंतर प्रमोद गायकवाड यांच्याशी बोलण झाले होते. प्रमोद

गायकवाड यांची गाडी माझ्या पतीच्या गाडीच्या मागे होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रमोद गायकवाड यांची गाडी एक कि.मी.मागे असल्याने त्याला घटनेबद्दल माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती वळणावर अती वेगाने गाडी चालवत होते. हे म्हणणे खरे नाही की, वळणावर माझ्या पतीला गाडी नियंत्रीत न झाल्याने डावीकडे न जाता ते उजवीकडे सरळ जाउन सामनेवाला याच्या गाडीवर धडकले. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती समोर चाललेल्या मोटार सायकलला ओलांडत असताना ते उजवीकडे गेले. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती अति वेगाने गाडी चालवत समोरील मोटार सायकलला ओलांडताना उजवीकडे जाउन सामनेवाला याच्या मोटार सायकलला जाउन धडकले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पती स्वतःच्या मरणाला स्वतः कारणीभूत झाले व सामनेवाला याच्या जखमाना देखील ते कारणीभूत झाले. हे म्हणणे खरे नाही की, अपघात माझ्या पतीच्या हयगयीने व निष्काळजीपणे गाडी चालवल्या मुळे झालेला आहे. हे मला माहीत नाही की, गैरअर्जदार हया अपघातात गंभीर जखमी झाला होता व त्याला लातूर येथील सहयाद्री हॉस्पीटल मध्ये दाखल केले होते. हे मला माहीती नाही की, सामनेवाला याच्या छातीच्या फासोळया मोडल्या आहेत, त्याचे पाय मोडले होते व त्याच्या उजव्या हाताला अपंगत्व आले आहे. हे मला माहीती नाही की, गैरअर्जदार हा दिड महीना हॉस्पीटल मध्ये अडमीट होता. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हा दवाखान्यात दाखल असल्याने त्यांनी माझ्या पती विरुद्ध तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार पोलीस खात्यात असल्याने व माझे पती मयत झाल्याने मी पैसे मिळवण्या करीता खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसावर दवाब आणण्या करीता मी पोलीस अधिक्षक व पोलीस महासंचालक यांच्या कडे खोटया तक्रारी केल्या.

२०. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीचे वय त्याच्या मृत्यू च्या वेळी ३४ वर्ष होते. माझ्या शपथपत्रातील त्यांचे वय चुकीचे नमुद केले आहे. माझ्या पतीचे शिक्षण इयत्ता १२ वी झाले होते. हे मला माहीत नाही की, माझ्या पतीने इलेक्ट्रीशनचा डिप्लोमा किंवा आय.टी.आय चा कोर्स केला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती इलेक्ट्रीक वायरमनचे काम करत होते असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा हजर केलेला नाही. माझे

पती त्याच्या मामाच्या दुकानात कामाला होते. त्या दुकानाचे नाव साई इलेक्ट्रीक होते. माझे पती दरमहा रक्कम रु.१८,०००/– कमवत होते असे दाखवणारा पुरावा हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती इलेक्ट्रीक वायरमनचे काम करत नव्हते व त्यांना दरमहा रक्कम रु.१८,०००/– उत्पन्न नव्हते म्हणूनच मी त्याबाबत कागदोपत्री पुरावा हजर केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला रक्कम रु.३८,९८,८००/–नुकसान भरपाई मिळावी हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार पोलीसात असल्याने नुकसान भरपाई मिळण्या करीता खोटा अर्ज केला व खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

Digitally signed by DIPAK BABALI MHALATKAR
Date: 2026.02.25 15:11:58 +0530

( डी.बी. म्हालटकर )

दि.२०/०२/२०२६ जिल्हा न्यायाधीश–१, उदगीर